MAHARASHTRA EDUCATION SOCIETY'S
(SINCE 1860)

# ABASAHEB GARWARE COLLEGE (Autonomous)

Karve Road, Deccan Gymkhana, Pune - 411 004, Maharashtra, India Ph: 020-41038200
E-mail : abasahebgarwarecollege@gmail.com Website www.garwarecollege.mespune.in

Prof.(Dr.) Vilas Ramchandra Ugale
MA Ph.D.
Principal

- NAAC Re-Accredited 'A' Grade
- Best College Award - Savitribai Phule Pune University
- Best Student Development Board Award - Savitribai Phule Pune University

- I.D.No. PU/PN/A.S/009(1945)
- JR.COLLEGE CODE : 11.11.003
- AISHE CODE : C-41477
- PUN CODE : CAAP 010040

संदर्भ क्र.:

दि.११ /०३/२०२६

**राष्ट्रीय सेवा योजना (२०२५-२०२६)**

**शिबीर उपक्रम - (वरिष्ठ विभाग)**

शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ मध्ये राष्ट्रीय सेवा योजनेत मएसोच्या आबासाहेब गरवारे महाविद्यालय (स्वायत्त) मधील एकूण ३०० विद्यार्थ्यांना स्वयंसेवक म्हणून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात सहभागी होण्याची संधी मिळाली. या वर्षी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या निर्देशनानुसार आपल्या महाविद्यालयातील रासेयो विभागाने पुढील उपक्रम घेतले. या शैक्षणिक वर्षात सामाजिक बांधिलकी जपण्यासाठी महाविद्यालयातील स्वयंसेवकांनी वृक्षारोपण, जनजागृती मोहीम, रक्तदान, श्रमसंस्कार शिबिरे तसेच कौटुंबिक, आर्थिक व सामाजिक सर्वेक्षण अशा अनेक उपक्रमात योगदान दिले.

या वर्षी दिनांक १५ डिसेंबर २०२५ ते २१ डिसेंबर २०२५ रासेयोचे विशेष श्रमसंस्कार शिबीर या दरम्यान मु. दौंडकरवाडी, ता. खेड, पुणे येथे आयोजित केले होते. या शिबिरामध्ये महाविद्यालयाचे रासेयोचे १५० स्वयंसेवक सहभागी झाले. शिबिराचे उद्घाटन म.ए.सो. चे अध्यक्ष श्री. बाबासाहेब शिंदे यांनी केले. शिबिराच्या पहिल्या दिवशी महाविद्यालयाचे प्राचार्य मा.डॉ. विलास उगले सरांनी विद्यार्थ्यांना स्वतःच्या अनुभवाने प्रेरित केले. त्याचबरोबर विद्यार्थ्यांचे सहा संघ निर्माण केले त्या संघांना कोकण, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, खानदेश, विदर्भ व स्वराज्य असे नावे देण्यात आली. प्रत्येक संघाने निवडून दिल्याप्रमाणे जेवणाची त्याचबरोबर व्यवस्थापनाची त्याचबरोबर सांस्कृतिक कार्यक्रमांची धुरा सांभाळली.

रा.से.यो. हिवाळी शिबिरातील दिनचर्या ही सकाळच्या विद्यापीठ आणि रा.से.यो. गीताने होत होती. त्यानंतर विद्यार्थ्यांकडून योगासने व व्यायाम करून घेतला जात. विद्यार्थ्यांचा बौद्धिक विकास भावा यासाठी शिबिरातील प्रत्येक दिवशी एका खास प्रवक्तांना बोलवण्यात येत. यामध्ये दुसऱ्या दिवशी आबासाहेब गरवारे महाविद्यालयातील डॉ. पांडुरंग कंद सर यांनी संपूर्ण आरोग्यासाठी मानसिक आरोग्य कसे महत्वाचे आहे यावर स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले. तीसऱ्या दिवशी श्री सुधीर जी गाडे सरांनी वंदे मातरम १५० वर्षे, भारतात क्रांतीकारकांची भुमिका यावर मार्गदर्शन



Scanned with OKEN Scanner

केले. चौथ्या दिवशी डॉ. प्रफुल्ल शेडे यांनी आरोग्य आणि ग्रामीण जीवन यावर स्वयंसेवकांनी संबोधित केले. पाचव्या दिवशी डॉ. शोभा वाघमोडे यांनी २०२७ मधील विकसित भारत कसा असेल व युवकांची भूमिका काय, सहाव्या दिवशी डॉ. कुंडलिक पारधी सरांनी रा. से. यो. स्वयंसेवकांची सामाजिक जडणघडणीत काय भूमिका असते या विषयावर मार्गदर्शन केले.

या हिवाळी शिबिरा अंतर्गत विद्यार्थ्यांनी गावामध्ये गावची स्वच्छता, गावात झाडे लावणे, बंधारा बंधने व दुरूस्ती करणे, वनक्षेत्र संवर्धन इत्यादी प्रकारचे विविध लोकोपयोगी कामे केली. यावर्षी या गावात एक मिळकत एक झाड हा विशेष उपक्रम राबविला गेला. त्या अनुषंगाने प्रत्येक मिळकतीत स्वयंसेवकांनी आंबा, चिक्कू आणि नारळ यापैकी एक झाड प्रत्येक मिळकत धारकाच्या घरी जाऊन लावले. गावच्या सरपंच यांनी सुद्धा या कामाचे कौतुक केले. सांस्कृतिक विभागामध्ये विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या नाटकाद्वारे वृक्ष संवर्धन मतदानाची आवश्यकता या विविध विषयाची जाणीव करून दिली. २१ डिसेंबरला शिबीर समाप्तीला महाराष्ट्र एजुकेशन संस्थेचे सदस्य डॉ. संतोष देशपांडे, राजगुरुनगर तालुक्याचे माजी आमदार श्री. दिलीप अण्णा मोहिते पाटील, महाविद्यालायचे प्राचार्य प्रा. डॉ. विलास उगले, दौंडकरवाडीचे सरपंच श्री. सीताराम गुजर, उपसरपंच सौ. गंगा कामठे, माजी सरपंच वामन लांडे हजर होते. डॉ. संतोष देशपांडे सरांनी स्वयंसेवकांना आजचा युवक आणि उद्याचा भारत याबद्दल मार्गदर्शन केले. श्री. दिलीप अण्णा मोहिते पाटील यांनी त्यांच्या अनुभव कथनातून राष्ट्रीय सेवा योजना कशी राबविता येईल व शिबीर संपल्यानंतर स्वयंसेवकांनी काय करणे अपेक्षित आहे याबद्दल मार्गदर्शन केले. शिबिराला समाप्ती देण्यात आली.

राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे शिबीर पार पाडण्यासाठी मा. प्राचार्य, सर्व उपप्राचार्य, तसेच शिक्षक आणि शिक्षेतर कर्मचारी यांचे सहकार्य वेळोवेळी मिळत राहिले.

रासेयो कार्यक्रम अधिकारी
कार्यक्रम अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना
आबासाहेब गरवारे महाविदयालय (स्वायत्त)
कर्वे रोड, पुणे-४.

NATIONAL SERVICE SCHEME A. G. C. PUNE-4.

M.E.S. Abasaheb Garware College Pune-4.

प्राचार्य
म.ए.सो.चे आबासाहेब गरवारे महाविद्यालय
कर्वे रोड, पुणे-४.



Scanned with OKEN Scanner